**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :- भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१२ चिश्तिया कब्रस्तान,बाबा हॉटेल जवळ भिवंडी याठिकाणी रिटेनिंग भिंत,पेव्हरब्लॉक बसविणे व इतर बांधकाम करणे.**

भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१२ चिश्तिया कब्रस्तान,बाबा हॉटेल जवळ भिवंडी याठिकाणी रिटेनिंग भिंत,पेव्हरब्लॉक बसविणे व इतर बांधकाम करणे कामी रु.५९,९९,९७४/-मात्रच्या प्रस्तावांस मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील प्रशासकिय मान्यतेचा आदेश जा.क्र. सामान्य/नवि/टे-२/अल्पसंख्याक/भिनिशमनपा/प्र.मा./कावि-८२८/२०२२ दिनांक ०६/०७/२०२२ अनव्ये प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळलेली आहे. सदर कामाची रक्कम रु.५९,९९,९७४/-मात्रची ई निविदा सुचना क्र.११०/२०२२-२३ दै.लोकमत.दै.मिड-डे या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www. mahatenders.gov.in) देऊन या संकेतस्थळावर दि.११/८/२०२२ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असता निविदा समितीच्या छाननी अंती प्रस्तुत कामी दोन्ही पात्र निविदा प्राप्त झाल्यामुळे याकामी मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांचे देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०४% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.५६,९७,५५९/- येत आहे.

मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०४% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.५६,९७,५५९/-(अक्षरी छपन्न् लाख सत्याण्णव हजार पाचशे एकुणसाठ मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त् महोदय यांनी त्यास दि.०४/१०/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासक मान्यता या मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र. ४७ दिनांक :- २५/१०/२०२२

भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१२ चिश्तिया कब्रस्तान,बाबा हॉटेल जवळ भिवंडी याठिकाणी रिटेनिंग भिंत,पेव्हरब्लॉक बसविणे व इतर बांधकाम करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.०४% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.५६,९७,५५९(अक्षरी छपन्न् लाख सत्याण्णव हजार पाचशे एकुणसाठ मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१२ चिश्तिया कब्रस्तान,बाबा हॉटेल जवळ भिवंडी याठिकाणी रिटेनिंग भिंत,पेव्हरब्लॉक बसविणे व इतर बांधकाम करणे कामी सर्वात कमी दराचे

निविदाकार मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :- भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१५ मेहबुबीया कब्रस्तान,नवीवस्ती भिवंडी याठिकाणी पत्राशेड रिटेनिंग भिंत,पथदिवे,कब्रस्तानसाठी लालमाती पुरविणे व पेव्हरब्लॉक बसविणे व इतर बांधकाम करणे.**

भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१५ मेहबुबीया कब्रस्तान,नवीवस्ती भिवंडी याठिकाणी पत्राशेड रिटेनिंग भिंत,पथदिवे,कब्रस्तानसाठी लालमाती पुरविणे व पेव्हरब्लॉक बसविणे व इतर बांधकाम करणे कामी रु.३९,९९,८६७/-मात्रच्या प्रस्तावांस मा.जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील प्रशासकिय मान्यतेचा आदेश जा.क्र. सामान्य/नवि/टे-२/अल्पसंख्याक/भिनिशमनपा/प्र.मा./कावि-८२८/२०२२ दिनांक ०६/०७/२०२२ अनव्ये प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळलेली आहे. सदर कामाची रक्कम रु.३९,९९,८६७/-मात्रची ई निविदा सुचना क्र.११०/२०२२-२३(८२१५९९)दै.लोकमत.दै.मिड-डे या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www. mahatenders.gov.in) देऊन या संकेतस्थळावर दि.११/८/२०२२ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असता निविदा समितीच्या छाननी अंती प्रस्तुत कामी दोन्ही पात्र निविदा प्राप्त झाल्यामुळे याकामी मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांचे देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.१४०% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३७,९४,२७३/- येत आहे.

मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.१४०% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३७,९४,२७३/-(अक्षरी सदतीस लाख चौराहण्णव हजार दोनशे त्रेहात्तर मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त् महोदय यांनी त्यास दि.०४/१०/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासक मान्यता या मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र. ४६ दिनांक :- २६/१०/२०२२

मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५.१४०% कमी दराने म्हणजेच रक्कम रु.३७,९४,२७३/-(अक्षरी सदतीस लाख चौराहण्णव हजार दोनशे त्रेहात्तर मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी निजामपुर मनपा हदिदतील वॉर्ड क्र.१५ मेहबुबीया कब्रस्तान,नवीवस्ती भिवंडी याठिकाणी पत्राशेड रिटेनिंग भिंत,पथदिवे,कब्रस्तानसाठी लालमाती पुरविणे व पेव्हरब्लॉक बसविणे व

इतर बांधकाम करणे कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.मा.मुंब्रादेवी इंटरप्रायजेस,ठाणे यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(**विजयकुमार म्हसाळ**)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

प्रति:- सचिव भि.नि.श.म.न.पा.
प्रेषक:- आयुक्त, भि.नि.श.म.न.पा.

प्रस्तावना

गोषवारा

**विषय - अर्थसंकल्पीय तरतूदीचे पुर्नविनियोजन करणे कामी प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन समिती,ठाणे यांच्या आदेशाप्रमाणे व मा.आमदार श्री.रईस ,शेख ,विधानसभा सदस्य,भिवंडी यांचे पत्राच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपुर महानगरपालिका (ड वर्ग) क्षेत्र हद्दीतील रस्त्यांची / गटार बनविणेसाठी नगरोत्थान योजनेअंतर्गत खालील कामे प्रस्तावित केली आहेत. त्यास अंदाजपत्रकिय किमंतीच्या ७० टक्के हिस्सा जिल्हा नियोजन समिती मार्फत उपलब्ध करुन देणार आहेत व उर्वरित ३० टक्के हिस्सा म.न.पा ने भरावयाचा असल्याने सदर कामांना रु.९९.९० लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये जिल्हा नियोजन समिती,ठाणे यांचा ७० टक्के हिस्सा रु. ६९,९३,०००/- तर ३० टक्के हिस्सा रु.२९,९७,०००/- महापालिकेचा आहे. खालील प्रमाणे प्रस्तावित कामे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.४ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| २ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.३ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ३ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.१२ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ४ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.१४ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ५ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.३ वार्ड क्र.१६ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ६ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.१५ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ७ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.११ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ८ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.१० मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| ९ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.९ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| १० | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.३ वार्ड क्र.१७ मधील विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | ९.९९ |
| | एकूण रक्कम | ९९.९० लक्ष |

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या खालील लेखाशिर्षामधुन रक्कम कमी करुन महापालिकेचा हिस्सा **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान** या नविन लेखाशिर्षाखाली रु. २९.९७ लक्ष ऐवढया रक्कमेचे पुर्नविनियोजन खालील लेखाशिर्षामधून करण्यात येण्याचा तपशील खालील प्रमाणे

| **लेखाशिर्षकाचे नाव** | **सन २०२२-२३ करीता करणेत आलेली तरतूद** | **सन २०२२-२३ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च** | **दि. ६/९/२०२२ पर्यंतची शिल्लक** |
|---|---|---|---|
| शाळेच्या इमारती बांधणे | रु. १००.०० लक्ष | रु.२०.०० लक्ष | रु. ८०.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३,व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाला नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो. व असे पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्याकडे निहीत आहेत.

शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०२२-२३ करीता रु.१००.०० लक्ष ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी आज रोजीपर्यत रु.२०.०० लक्ष खर्च झाले आहेत व उर्वरित रु.८०.०० लक्ष शिल्लक आहेत. तरी शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्षामधून रु. ३०.०० लक्ष रुपयाचे **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान** या नविन लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासाक तथा आयुक्त सो. यांनी दिनांक - २०/९/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ४५

**दिनांक -** १८/१०/**२०२२.**

भिवंडी मनपा हद्दीतील प्रभाग समिती क्र. १, २ व ३ च्या हद्दीतील रस्त्यांच्या हद्दीतील गटार बनविण्याकरीता नगरोत्थान योजने अंतर्गत मा.श्री. रईस शेख ,विधान सभा सदस्य भिवंडी यांनी प्रस्तावित केलेली १० कामे एकूण १० कामांच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या ७० टक्के हिस्सा म्हणजे रु.६९,९३,०००/-जिल्हा नियोजन समिती उपलब्ध करुन देणार आहे तर ३० टक्के म्हणजे रु.२९,९७,०००/-महापालिकेने देण्याचे आहे. त्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या लेखाशिर्षकात नव्याने तरतूद करणे आवश्यक असल्याने लेखासंहिता १९७१ नियम ३० (३) मध्ये दिलेल्या विविरण पत्रानुसार शाळेच्या इमारती बांधणे या लेखाशिर्षकात शिल्लक तरतूद रु. ८० लक्षामधून रु.३० लक्ष तरतूद महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान यालेखाशिर्षकात पुर्नविनियोजन करण्यास महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**विषय :- सन २०२२-२३ मध्ये मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान वाटप करणे कामी रक्कम रुपये 75.00 लक्ष रकमेचे पुर्नविनियोजन (Reappropriation) करणेकरीता मान्यता मिळणेबाबत.**

## प्रस्तावना

महानगरपालिकेच्या सन 2022-23 वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान वाटप करणे या शिर्षाखाली रु. 400.00 लक्ष इतका निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे.

मात्र सन 2022-23 या वर्षातील सदर लेखाशिर्षातील संभाव्य खर्चविचारात घेता विभागाच्या वतीने वाढीव तरतुद म्हणून 75.00 लक्ष रकमेचे आपत्कालीन परिस्थितीत करावा लागणारा खर्च या लेखाशिर्षातून मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान वाटप करणे या लेखाशिर्षात रक्कम रुपये 75.00 लक्ष रकमेचे पुनर्विनियोजन (Reappropriation) करणेकरीता अहवाल प्रस्तावित केला असता मा. मुख्य लेखा व वि त्त अ धि कारी, मा. मुख्य लेखा परि क्षक, मा. अति. आयुक्त सो, मा. आयुक्त सो, यांनी मान्यता दिलेली आहे. सबब नि यम 30 (3) नुसार आपत्कालीन परिस्थितीत करावा लागणारा खर्च या लेखाशिर्षातून मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान वाटप करणे या लेखाशिर्षात रक्कम रुपये 75.00 लक्ष रकमेचे पुर्नविनियोजन (Reappropriation) करणेस प्रशासक म्हणून आपली मान्यता मिळणेस सादर करीत आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ४४ दिनांक २५/१०/२०२२

सन २०२२-२३ मध्ये मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान वाटप करणे कामी रक्कम रुपये 75.00 लक्ष रकमेचे पुर्नविनियोजन (Reappropriation) करणेकरीता मान्यता मिळणेबाबत सादर प्रस्तावानुसार सन 2022-23 या वर्षातील सदर लेखाशिर्षातील संभाव्य खर्च विचारात घेता विभागाच्या वतीने वाढीव तरतुद म्हणून 75.00 लक्ष रकमेचे आपत्कालीन परिस्थितीत करावा लागणारा खर्च या लेखाशिर्षातून मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान वाटप करणे या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन (Reappropriation) करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अच्या (१ अ ) व (१ ब) मधील तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक, भिवंडी नि. शहर महानगरपालिका, नियम 30 (3) नुसार मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

दिनांक / /२०२२ च्या सभेत सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र आकडे लाखात

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्र |
| १ | (अग्नीशमन) महसुली खर्च ड-१-१ | आपत्तकालीन परिस्थीतीत करावा लागणारा खर्च | १,०००.०० | ३७९.१२ | ६२०.८७ | अ-भाग-२ महसुली खर्च अ-३ | मनपा कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट व आपत्कालीन आर्थिक मदत | ४००.०० | निरंक | ७५.०० | मनपा कर्मचा दिवाळी सा अनुदान वाट कामी एकुण लक्ष खर्च अ |

प्र. आस्थापना विभाग प्रमुख
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

नि.आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**
**विद्युत विभाग**

**प्रस्तावना**
**प्रति:- मा.प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**विषय:- अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-५ च्या कामात अडथळा होत आलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए.मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने पथदिवे पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणे.**

**मे. सादर,**

महानगरपालिका हददीत ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ मार्गावरील अंजूरफाटा ते राजीव गांधी चौक या भिवंडी मनपा हददीतील रस्त्या मधील मेट्रोच्या बांधकामात अडथळा निर्माण होणारे रस्त्याच्या मध्यभागी असलेले मनपाचे स्ट्रिट लाईट व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आले होते. त्यामुळे सदर रोडवर अंधार होत असल्याने रस्त्याच्या मध्यभागी मेट्रोचे पीलर उभे केल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस अंजुरफाटा ते राजीव गांधी चौक पर्यंत पथदिवे बसविणेबाबतचा प्रस्ताव इकडिल कार्यालयाचे पत्र जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/८७२ दिनांक १०/११/२०२० चे पत्र व पत्र जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/१३६८ दिनांक ३०/१२/२०२२ चे पत्र नुसार २४२ पथदिवे, पोलसहित व इतर साहित्यासहित बसविणे कामी रक्कम रुपये १,४८,६५,४२५/- मात्रच्या खर्चाचे अंदाजपत्रक एम.एम.आर.डी.ऐ. कडे सादर केले होते. दिनांक ३०/१२/२०२१ रोजी केलेल्या संयुक्त पाहणी दरम्यान मेट्रो - ५ चे काम अंजुरफाटा ते तिरूपती हॉस्पिटल पर्यंतचे मंजूर असल्याने तिरूपती हॉस्पिटल ते राजीव गांधी चौक पर्यंतचे पथदिव्याचे काम वगळण्यात येवून अंजुर फाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंत २१० पथदिवे लावणे बाबत रुपये १,३१,११,०४९/- खर्चास एम.एम.आर.डी.ए. ने मान्यता दिली आहे. महानगरपालिकेने सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यतेसह निविदा प्रक्रिया राबविणे व ठेकेदार निश्चित करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल एम.एम.आर.डी. कडे सादर केल्यानंतर त्याबाबतची रक्कम महानगरपालिकेकडे सादर केली जाईल. अशा अटीवर मंजूरी देण्यात आलेली आहे.

वरिल कामाकरिता सन २०२२-२३ च्या सा.बा. ,खाते विदयुत विभागा कडिल दरसुची नुसार सविस्तर अदांजपत्रक तयार केले असता, २१० पथदिव्याकरिता रुपये १,४४,४५,३५८/- इतका खर्च येणार आहे. एम.एम.आर. डी.ए. ने मंजुर केलेल्या रुपये १,३१,११,०४९/- च्या खर्चापेक्षा रुपये १३,३४,३३६/- इतका खर्च जास्त येणार आहे. सदरचा जादा खर्च एम.एम.आर.डी.ए. मार्फत मंजूर न झाल्यास महानगरपालिके मार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार असल्याने प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

(सुनिल ज्ञानदेव घुगे)
**शहर अभियंता**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना

**विषय:- अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-५ च्या कामात अडथळा होत आलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए.मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने पथदिवे पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणे.**

**मे. सादर,**

महानगरपालिका हददीत ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ मार्गावरील अंजूरफाटा ते राजीव गांधी चौक या भिवंडी मनपा हददीतील रस्त्या मधील मेट्रोच्या बांधकामात अडथळा निर्माण होणारे रस्त्याच्या मध्यभागी असलेले मनपाचे स्ट्रिट लाईट व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आले होते. त्यामुळे सदर रोडवर अंधार होत असल्याने रस्त्याच्या मध्यभागी मेट्रोचे पीलर उभे केल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस अंजुरफाटा ते राजीव गांधी चौक पर्यंत पथदिवे बसविणेबाबतचा प्रस्ताव इकडिल कार्यालयाचे पत्र जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/८७२ दिनांक १०/११/२०२० चे पत्र व पत्र जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/१३६८ दिनांक ३०/१२/२०२२ चे पत्र नुसार २४२ पथदिवे, पोलसहित व इतर साहित्यासहित बसविणे कामी रक्कम रुपये १,४८,६५,४२५/- मात्रच्या खर्चाचे अंदाजपत्रक एम.एम.आर.डी.ऐ. कडे सादर केले होते. दिनांक ३०/१२/२०२१ रोजी केलेल्या संयुक्त पाहणी दरम्यान मेट्रो - ५ चे काम अंजुरफाटा ते तिरूपती हॉस्पिटल पर्यंतचे मंजूर असल्याने तिरूपती हॉस्पिटल ते राजीव गांधी चौक पर्यंतचे पथदिव्याचे काम वगळण्यात येवून अंजुर फाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंत २१० पथदिवे लावणे बाबत रुपये १,३१,११,०४९/- खर्चास एम.एम.आर.डी.ए. ने मान्यता दिली आहे. महानगरपालिकेने सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यतेसह निविदा प्रक्रिया राबविणे व ठेकेदार निश्चित करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल एम.एम.आर.डी. कडे सादर केल्यानंतर त्याबाबतची रक्कम महानगरपालिकेकडे सादर केली जाईल. अशा अटीवर मंजूरी देण्यात आलेली आहे.

वरिल कामाकरिता सन २०२२-२३ च्या सा.बा. ,खाते विदयुत विभागा कडिल दरसुची नुसार सविस्तर अदांजपत्रक तयार केले असता, २१० पथदिव्याकरिता रुपये १,४४,४५,३५८/- इतका खर्च येणार आहे. एम.एम.आर. डी.ए. ने मंजुर केलेल्या रुपये १,३१,११,०४९/- च्या खर्चापेक्षा रुपये १३,३४,३३६/- इतका खर्च जास्त येणार आहे. सदरचा जादा खर्च एम.एम.आर.डी.ए. मार्फत मंजूर न झाल्यास महानगरपालिके मार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार असल्याने प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**ठराव क्रमांक** 83 **दिनांक :-** 26/10/22

**विषय:- अंजूरफाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंतच्या रोडवरील, ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो-५ च्या कामात अडथळा होत आलेले पथदिवे व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आल्याने सदर रोडवर दोन्ही बाजूस नव्याने पथदिवे पुरविणे, बसविणे कार्यान्वित करणेकामीच्या प्रस्तावास प्रशासकिय मिळणेबाबत.**

महानगरपालिका हददीत ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ मार्गावरील अंजूरफाटा ते राजीव गांधी चौक या भिवंडी मनपा हददीतील रस्त्या मधील मेट्रोच्या बांधकामात अडथळा निर्माण होणारे रस्त्याच्या

मध्यभागी असलेले मनपाचे स्ट्रिट लाईट व पोल एम.एम.आर.डी.ए. मार्फत काढण्यात आले होते. त्यामुळे सदर रोडवर अंधार होत असल्याने रस्त्याच्या मध्यभागी मेट्रोचे पीलर उभे केल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस अंजुरफाटा ते राजीव गांधी चौक पर्यंत पथदिवे बसविणेबाबतचा प्रस्ताव इकडिल कार्यालयाचे पत्र जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/८७२ दिनांक १०/११/२०२० चे पत्र व पत्र जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/१३६८ दिनांक ३०/१२/२०२२ चे पत्र नुसार २४२ पथदिवे, पोलसहित व इतर साहित्यासहित बसविणे कामी रक्कम रुपये १,४८,६५,४२५/- मात्रच्या खर्चाचे अंदाजपत्रक एम.एम.आर.डी.ए. कडे सादर केले होते. दिनांक ३०/१२/२०२१ रोजी केलेल्या संयुक्त पाहणी दरम्यान मेट्रो - ५ चे काम अंजुरफाटा ते तिरूपती हॉस्पिटल पर्यंतचे मंजूर असल्याने तिरूपती हॉस्पिटल ते राजीव गांधी चौक पर्यंतचे पथदिव्यांचे काम वगळण्यात येवून अंजुर फाटा ते तिरुपती हॉस्पिटल पर्यंत २१० पथदिवे लावणे बाबत रुपये १,३१,११,०४९/- खर्चाच्या प्रस्तावास महानगरपालिकेने सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यतेसह निविदा प्रक्रिया राबविणे व ठेकेदार निश्चित करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल एम.एम.आर.डी. कडे सादर केल्यानंतर त्याबाबतची रक्कम महानगरपालिकेकडे सादर केली जाईल. अशा अटीवर मंजूरी देण्यात आलेली आहे.

वरिल कामाकरिता सन २०२२-२३ च्या सा.बा. ,खाते विदयुत विभागा कडिल दरसुची नुसार सविस्तर अदांजपत्रक तयार केले असता २१० पथदिव्यांकरिता रुपये १,४४,४५,३५८/- इतका खर्च येणार आहे. एम.एम. आर.डी.ए. ने मंजुर केलेल्या रुपये १,३१,११,०४९/- च्या खर्चापेक्षा रुपये १३,३४,३३६/- इतका खर्च जास्त येणार आहे. सदरचा खर्च एम.एम.आर.डी.ए. कडे मंजूर न झाल्यास महानगरपालिकेने करावयाचा आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्रक्र ७१(भाग-२)नवि-१४, दिनांक ०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ(१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर कामी प्र.कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अतिरीक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार विषयांकित कामा करिता येणाऱ्या रक्कम रुपये १,४४,४५,३५८/- खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मंजूर करण्यात येत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## बांधकाम विभाग,

**विषय :- बि.ओ.टी तत्वावरिल आरक्षण क्र. ११ (जुने आरक्षण क्र. ५४) येथिल मार्केट इमारत बी.ओ. टी. तत्वावर विकासित करण्याचे प्रकल्पाकरिता वित्तिय सल्लागाराची नेमणूक करणे बाबत**

प्रभाग भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दितील आरक्षण क्र. ११ ( जुने आरक्षण क्र. ५४) येथिल मार्केट इमारत बी.ओ.टी. तत्वावर महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७९ प्रमाणे विकसित करणेकामी मा. महासभा ठराव क्र. ३९९ दिनांक १८/१०/२०२१ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदर कामासाठी वित्तिय सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक असल्याने भिवंडी निजामपूर महापालिकेच्या विविध प्रकल्पासाठी पी.पी.पी. बी.ओ.टी/एफ बी.टी तत्वावरिल प्रकल्पाकरिता मॅग्नेट ॲडव्हायसरी सर्व्हिस प्रा. लि. मुंबई यांच्या १.९५ टक्के दरास स्थायी समिती ठराव क्र. ३८ दिनांक १८/७/२०१३ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती.

विषयांकित प्रकरणी मा. आयुक्त सो। यांचे दालनात झालेल्या बैठकित मॅग्नेट ॲडव्हायसरी सर्व्हिस प्रा. लि. मुंबई यांनी मंजूर दरात म्हणजेच १.९५ टक्के दराऐवजी १.१० टक्के दराने काम करण्यास लेखी सहमती दर्शवलेली आहे.

तरी आरक्षण क्र. ११ (जुने आरक्षण क्र. ५४) येथिल मार्केट इमारत बी.ओ.टी. तत्वावर विकसित करणेकामीच्या प्रकल्पाकरिता मॅग्नेट ॲडव्हायसरी सर्व्हिस प्रा. लि. मुंबई यांच्या प्रकल्पाच्या किमतीच्या १.१० टक्के शुल्कास प्रशासकिय ठराव मिळणेकामी सादर

**प्रशासकिय ठराव क्र.** ४२ **दिनांक** १७/०७/2022

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे आरक्षण क्र. ११ ( जुने आरक्षण क्र. ५४) येथिल मार्केट इमारत बी.ओ.टी. तत्वावर विकासित करण्याचे प्रकल्पाकरिता वित्तिय सल्लागाराची नेमणूक करून बी.ओ.टी. तत्वावर इमारत विकसित करणेकामी वित्तिय सल्लागार मॅग्नेट ॲडव्हायसरी सर्व्हिस प्रा. लि. मुंबई यांना प्रकल्प किमतीच्या १.१० टक्के शुल्कास मंजुरी मिळणेकामी प्रस्तावना प्राप्त झालेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ क नुसार संविदा करण्यास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडिल शासन आदेश अन्वये मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मंजूरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी नि. शहर महानगरपालिका

Old 54 New 11 PrashashkiyTharav